International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.10 No.1 Sept – Oct 2022

# भारतातील अल्प भूधारक शेतकऱ्यांच्या समस्या

**प्रा. शुभम मनोहर सुरवाडे**
अर्थशास्त्र विभाग, ज.जि.म.वि.प्र.सह.समाजाचे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय
(नूतन मराठा महाविदयालय), जळगाव – ४२५००१

**सारांश:**

भारतीय समाजाच्या उदरनिर्वाहाचे मुख्य साधन म्हणून शेती व शेती संबंधित संसाधने याकडे पहिले जाते परंतु समाजामध्ये अनेक प्रकराची विषमता असल्याने शेतीचे वाटप आणि गरजा भागविणारी साधने सर्वांकडे एक सारखी नाहीत. म्हणून शेतीच्या आकारमानानुसार शेतकऱ्यांचे एकूण पाच प्रकार पडलेले आहेत शेतकरी हा लहान असो कि मोठा त्या सर्वांचा देशाच्या आर्थिक विकासात मोलाचा वाट आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत शेती व्यवसायाला महत्वाचे स्थान देताना प्रत्येक अंदाजपत्रकाच्या वेळी सरकार शेतकऱ्यांसाठी विशेष आर्थिक तरतूद करीत असते तरीही अल्प भूधारक शेतकऱ्यांच्या समस्यांचे उच्चाटन झाले. असे आढळून येत नाही त्यांच्या काही समस्यांचा विचार प्रस्तुत ठिकाणी करण्यात आलेला आहे.

**उद्दिष्ट्ये:**

१. अल्पभूधारक शेतकऱ्याची संकल्पना स्पष्ट करणे.

२. अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतीकरण्याच्या पद्धती समजून घेणे.

३. अल्पभूधारक शेतकर्यांच्या आर्थिक, कौटुंबिक व सामाजिक समस्यांची चिकित्सा करणे.

**गृहीतके:**

१. अल्प भूधारक शेतकऱ्यांकडे पाच एकर पेक्षा कमी शेती क्षेत्र असते.

२. अल्पभूधारक शेतकऱ्यांकडे शेती विषयक अत्याधुनिक साधनांचा अभाव असतो.

३. अल्प भूधारक शेतकऱ्यांच्या शेती उत्पादनातून त्याच्या जीवनविषयक गरजा पूर्ण भागात नाही.

**प्रास्ताविक:**

लोकसंख्या वाढीमुळे शेती क्षेत्रातील धारणक्षेत्राचे उपविभाजन झालेले असून पुन्हा त्या धारणक्षेत्राचे लहान लहान तुकडे झालेले आहेत. त्यावरून शेतकऱ्यांचे पाच प्रकार पडलेले आहेत. त्यापैकी कमी धारणक्षेत्र असलेले शेतकरी अल्पभूधारक म्हणून ओळखले जातात. पाच एकरपेक्षा कमी जमीन ज्यांच्याकडे आहे ते शेतकरी अल्पभूधारक म्हणून ठरविले गेले आहे. अशा शेतकऱ्यांना तहसिल कार्यालयापासून अल्पभूधारक असल्याचा दाखला मिळतो. त्याशिवाय त्यांना केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांचा लाभ घेता येतो. तसेच त्या शेतक-यांना स्वयं घोषणापत्रही करून द्यावे लागते..

**अल्पभूधारक शेतकरी व्याख्या व संकल्पना:** अल्पभूधारक शेतकऱ्याविषयी विशिष्ट संज्ञा ठरवितांना त्यांचे भूधारण क्षेत्र निश्चित केलेले आहे. तरीही अल्पभूधारक शेतकरी संकल्पनेविषयी अभ्यासकांमध्ये निरनिराळी मते आहेत.

१) "देशात लहान शेतकरी म्हणजे ज्यांच्याकडे सरासरी २ हेक्टरची जमीन आहे."[०१]

२)"जो शेतकरी एक हेक्टरपेक्षा जास्त, परंतु दोन हेक्टरपेक्षा कमी असलेली जमीन व्यक्तीश: कसतो तसेच वरील मर्यादेपर्यंत कसलेली जमीन कसणारे कुळ किंवा बागायतदार हे अल्पभूधारक शेतकरी ह्या व्याख्येत येतात."[०२]

३)"भारतातील ८५% शेतकरी हे छोटे आणि अल्पभूधारक अर्थात पाच एकर पेक्षा कमी जमीन असणारे आहेत. "[०३]

4)"गुंठाभर जमिनीपासून शेकडो एकर जमिनीपर्यंत विविध स्तरीय जमीन मालक या देशात आहेत. म्हणजे एकूणच अत्यंत विषमतापूर्ण अशी येथे जमीन मालकी आहे. त्यातून शेतकऱ्यांतसुद्धा अशीच कमालीची विषमता कशी आहे हेच स्पष्ट होते. एका बाजूला शेकडो एकर मालकी असलेले जमिनदार तर दुसऱ्या बाजूला किमान दररोजची भूक भागवू न शकणारे एखाद दुसऱ्या गुंठ्याचा तुकडा मालकीचा म्हणून मिरवणारे अल्पभूधारक शेतकरी जे धड शेतकरीही नाहीत की शेतमजूरही नाहीत. "[०४]

५) "Small holder farmers are vital for India's agriculture and rural economy. Small holder farmers-defined as those marginal and sub-marginal farm household that own or land cultivate less than 2.0 hecture of land-constitute about 78 percent of the country's famrers (act agricultural census 1990- 91). These small holders owned only 33 percent of the total cultivated land; their contricution to national grain production was nonetheless 41 percent. Their contribution to household food security and poverty alleviation is thus dis- proportionately high and is increasing. Moreover, as the national population increases, so does the number of small holdings."[०५]

६) "लहान शेतकरी कोणास म्हणावयाचे व मोठा शेतकरी कोणास म्हणावयाचे यासंबंधी शासनाने काही नियम केले आहेत. कोरडवाहू ५ एकरांपर्यंत शेती असणारा हा लहान शेतकरी समजण्यात आलेला आहे. यामध्ये अलीकडेच कर्जमाफीच्या संदर्भात ५ एकर क्षेत्रात विहीर बागायतीचा पण समावेश करण्यात आला आहे. म्हणजे ५ एकरांहून अधिक शेती असणारा शेतकरी हा लहान शेतकऱ्यामध्ये मोडत नाही. यामुळे त्याची गणना मोठ्या शेतकर्यात होते. ज्या दुष्काळी भागाकरीता डी.पी.ए.पी. नावाची लहान शेतकर्यांच्या विकासाची योजना लागू करण्यात आली आहे. त्याभागात ७.५ एकरपर्यंतचा शेतकरी हा लहान शेतकरी समजण्यात येतो व त्याला लहान शेतकऱ्यांच्या विकाससंबंधीच्या सर्व योजनांचा फायदा होतो. "[०६]

७) सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ महाराष्ट्र ऋणग्रस्ततेपासून मुक्तता अधिनियम १९७५ ची सुधारित आवृत्ती १ नोव्हेंबर २००६ पर्यंत दिलेली असून त्यामध्ये लहान शेतकरी विषयी संकल्पना स्पष्ट केली आहे. "लहान शेतकरी म्हणजे ओलिताखाली नसलेली एक हेक्टरपेक्षा अधिक, परंतु अशा प्रकारची दोन हेक्टरपेक्षा कमी जमीन धारण करणारा आणि अशी जमीन स्वतः करणारा शेतकरी आणि त्यात कुळ म्हणून किंवा पिकाखालील हिस्सेदार म्हणून ओलिताखाली नसलेली एक हेक्टरपेक्षा अधिक, परंतु अशा प्रकारची दोन हेक्टरपेक्षा अधिक नसेल एवढी जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांचा समावेश होतो. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटकी जमात किंवा विमुक्त जातीमधील व्यक्ती ही पूर्वोक्तप्रमाणे तिने धारण केलेल्या आणि ती कसत असलेल्या ओलिताखाली नसलेल्या जमिनीची मर्यादा लक्षात न घेता लहान शेतकरी मानण्यात येईल."

वरील व्याख्यांचा विचार केला असता एक ते दोन हेक्टरपर्यंत शेतजमीन ज्यांच्याकडे आहे. अशा शेतकऱ्यांना अल्पभूधारक शेतकरी म्हटलेले आहे. त्यांचे शेतजमीन धारणक्षेत्र लहान आकाराचे आहे.

**अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या समस्या:** भारतातील शेतकरी शेतीकडे एक उदरनिर्वाहाचे साधन म्हणून पाहत असला, तरी शेतीचा व्यवसाय करताना त्याला बऱ्याच समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यामध्ये प्रामुख्याने नैसर्गिक, भांडवली, मानवीश्रम विक्री, कर्ज साठवणूक व वाहतूक यांसारख्या नैसर्गिक आणि मानवीकृत समस्या त्याच्या वाट्याला नेहमी येताना दिसतात. त्याचे विशेष वर्गीकरण पुढीलप्रमाणे केलेले आहे.

**अ) नैसर्गिक समस्या :-** जमिनीची धूप होत असल्याने मातीचे सुपीक थर निघून जातात आणि जमिनीची सुपिकता कमी होते. काही ठिकाणी सुपीक जमीन असूनही तेथे क्षार व आम्लाचे प्रमाण वाढले की पिके चांगली येत नाहीत. जलसिंचन क्षेत्रात कृत्रिम पाणीपुरवठा जास्त होत असल्याने क्षारयुक्त जमिनीचे प्रश्न निर्माण झालेले आहेत. त्याचा शेतीवर प्रतिकूल

परिणाम झालेला आहे. महाराष्ट्रात मोसमी वाऱ्यापासून पडणारा पाऊस अनियमित व अनिश्चित स्वरूपाचा असून तो सगळीकडे सारखा पडत नाही. काही भागात दुष्काळ सदृश परिस्थिती निर्माण होते. अतिवृष्टी किंवा भरपूर पाऊस झालाच तर नद्यांना पूर येणे, पिकांमध्ये पाणी साचून राहणे यामुळे पिकांचे मोठे नुकसान होते. पिकांवर पडणारी कीड व रोगांमुळे पिकांची चांगली वाढ होत नाही. पिक हातचे जाते. धुके, गारा आणि वादळे यांच्यामुळेही पिकांची हानी होते. सर्वात मोठी समस्या नेहमीच्या अवर्षणप्रवण परिस्थितीने उद्भवते. इतर शेतकऱ्यांपेक्षा अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतीकरणावर नैसर्गिक समस्येचा सर्वात मोठा अनिष्ट परिणाम होतो.

आलेख क्र. १.१ : भारतातील सरासरी पावसाचे प्रमाण




स्त्रोत: https://www.mapsofindia.com/maps/india/annualrainfall.htm

आलेख क्र. १.१ राजस्थान, गुजरात, पश्चिम उत्तर प्रदेश, हरियाणा आणि पंजाबचे काही भाग आणि कर्नाटक, महाराष्ट्र आणि आंध्र प्रदेशातील मध्य द्वीपकल्पीय प्रदेश हे कमी पाऊस पडणारे क्षेत्र आहेत. उत्तर-पूर्व, पश्चिम किनारपट्टी, पूर्व मध्य प्रदेश, छत्तीसगड, पश्चिम बंगाल, झारखंड, बिहार आणि ओरिसा हे सर्वाधिक पाऊस पडणारे प्रदेश आहेत.

**ब)आर्थिक समस्या:** शेतीतील नैसर्गिक समस्या आणि पिक उत्पादनाची अनिश्चितता, हमी भावाचा प्रश्न यामुळे अल्पभूधारक शेतकऱ्यांना आर्थिक समस्यांना नेहमीच सामोरे जावे लागते. जलसिंचनाच्या सोयीसुविधा नसल्याने आधीच कमी असलेले शेतीक्षेत्र पीक लागवडीखाली आणता येत नाही. उत्तम बी-बियाण्यांचा अभाव असल्याने हे शेतकरी हलक्या दर्जाची बियाणे घेतात. त्यापासून उत्पादन कमी मिळते. जमिनीचा कस कायम ठेवून अधिक उत्पादन मिळविण्यासाठी नैसर्गिक व रासायनिक खतांचा पुरेसा वापर करणे आवश्यक असते, परंतु बहुतेक शेतकऱ्यांमध्ये बिकट आर्थिक परिस्थितीमुळे खत वापराचे प्रमाण कमी असते. बहुतांश शेतकरी गरीब असल्याने सावकाराकडून अधिक व्याजाने पैसे घेऊन शेती करतात. कर्जबाजारी होतात. परिणामी चांगले बी-बियाणे, यांत्रिक अवजारे, ठिबक व तुषार सिंचन व पुरेशी खते, यासारख्या भांडवलांचा त्यांच्याकडे अभाव असतो. आर्थिक अडचणीमुळे शेती करण्यासाठी यंत्राचा वापर न करता साध्या जुन्या अवजारांनीच शेतीची मशागत केली जाते. खेड्यातील शेतमाल शहरापर्यंत वेळेत व कमीतकमी खर्चात पोहचविण्यात अडचणी येतात. खेड्यांना लागून बाजारपेठांचा अभाव असल्याने शेतकऱ्यांना त्यांचा माल स्थानिक व्यापाऱ्यांना विकावा लागतो. त्यामुळे शेतीमालाला योग्य दर मिळत नाही. शेतीमाल साठविण्याची व्यवस्था नसल्याने शेतकऱ्यांना त्यांचा शेतीमाल लवकरात लवकर विकावा लागतो, तेव्हा मिळेल त्या दरात ते विकतात त्यामुळे त्यांचा तोटा होतो. अल्पभूधारक शेतकरी कर्जबाजारीपणा ही त्यांची मोठी समस्या बनलेली आहे.

**क) सामाजिक समस्या :-** लोकसंख्या वाढीमुळे कुटुंबातील शेतजमीन एका कुटुंबाकडून दुसऱ्या कुटुंबाकडे हस्तांतरित होते. त्यामुळे शेतीचे अपखंडन होत जाते. अशा अल्पभूधारण क्षेत्रात शेती करणे किफायतशीर नसते. श्रम व पैसा खर्च करूनही

दूरवरच्या शेतात पिक घेणे फायदेशीर ठरत नाही. आधुनिक तंत्रज्ञान व अपु-या वित्त साधनांचा अभाव असल्याने अल्पभूधारक शेतकरी पारंपरिक पद्धतीने शेतीची मशागत करतो. स्वाभाविकच शेतीतून कमी उत्पादन मिळते. तसेच शेतकरी हा त्याच्या श्रमापेक्षा दैववाद व रूढी परंपरेवर विश्वास ठेवून असल्याने जलसिंचन व शेतीविषयक नवीन तंत्रज्ञानाकडे त्याचे दुर्लक्ष होते. पूर्वीपासून तो शेतीकडे चरितार्थाचे साधन म्हणून पाहत आलेला असल्याने व्यापारी अथवा प्रायोगिक तत्त्वावर शेती करण्याकडे त्याचा कल नसतो. साहजिकच उत्पादन वाढीच्या प्रेरणा त्याच्या ठिकाणी नसतात..

**ड)तांत्रिक समस्या :-**यामध्ये पाणीपुरवठा, सुधारित बी-बियाणे, पीक संरक्षण, खते, आधुनिक यंत्रे या गोष्टींचा अभाव असणे याला तांत्रिक समस्या म्हटले गेले आहे. अपुऱ्या व अनियमीत पावसाचा कृषी व्यवसायावर विपरीत परिणाम होतो.पेरणीच्या वेळेस बऱ्याच शेतकऱ्यांना सुधारित बी-बियाणांचा वापर करण्याची फारशी माहिती नसते. चांगली व उत्तम प्रतिची बियाणे खरेदी करण्याची एपतही असत नाही. शेतीत पिक आलेच तर पिक संरक्षणाच्या सुविधा उपलब्ध नसल्याने उत्पादन घटते. सेंद्रीय खते परवडत नसल्याने ते शेणखताचा वापर करतात. अलीकडे त्याचा उपयोगही कमी कमी होत गेलेला आहे. अल्पभूधारक शेतकऱ्यांची शेती आकारणे लहान असल्याने त्यांची आर्थिक परिस्थिती जेमतेम असते. त्यामुळे ते आधुनिक यंत्राच्या सहाय्याने शेती करू शकत नाही. शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन मिळत नाही. परिणामी शेती करण्याच्या पद्धतीत बदल घडवून आणता आलेला नाही. शेतकऱ्यांच्या आर्थिक समस्या अधिक असल्याने शेतीसाठी लागणाऱ्या आदानांची व तांत्रिक समस्या भेडसावते.

**निष्कर्ष:**

१. दोन ते पाच एकर जमीन धारण क्षेत्र असलेल्या शेतकर्यांचा समावेश अल्पभूधारक शेतकऱ्यांमध्ये केला जातो

२. अल्पभूधारक शेतकऱ्यांकडे शेतीक्षेत्र कमी असल्याने चरित्रतहासाठी त्यांना इतरत्र मजुरीत जावे लागते

३. सिंचन सुविधांचा अभाव असल्याने भागायती शेती करता येत नाही. पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्याने सततच्या अवर्षणामुळे त्यांचे आर्थिक गणित बिघडते

४. त्यांना वेळेवर आर्थिक पत पुरवठा मिळत नसल्याने बियाणे व खाते घेऊन शेती करण्यास मोठी अडचण होते

५. आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने समाजात मनाचे स्थान नसते. शिवाय कुटुंबाच्या शैक्षणिक, आरोग्यविषयक आणि मूलभूत गरजा भागवण्याविषयीच्या समस्या अधिक उद्भवतात

**संदर्भ**

०१. साठे मधुसूदन (२००८) भारताच्या आर्थिक समस्या, डायमंड पब्लिकेशन, पुणे, पृ. १६

०२. तुपे संदीप काकासाहेब (२०१३) सीमांत व अल्पभूधारक शेतकरी यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे अध्ययन विशेष संदर्भ औरंगाबाद जिल्हा, पीएचडी प्रबंध, पृ. १७

०३. चव्हाण सुनिल (२०१५ ) पॅकेज अनुदाने तारक की मारक?, दैनिक महाराष्ट्र टाईम, जानेवारी १८

०४. शिरगुप्पे राजा (२०१८), शेतकरी, जातिव्यवस्था व जागतिकीकरण, अक्षरगाथा, वर्ष आठवे, अंक चौथा, १० जानेवारी २०१८, पृ. ८३

०५. Small holder famers in India: Food security and agricultural policy, Food and agriculture organisation of the united nations, Regional office for Asia and the Pacific, Bangkok, Thailand, RAP Publication 2002/03)

०६. पाटील के. डी. (१९८१): लहान शेतकऱ्यांचा विकास, साप्ताहिक साधना, ४ एप्रिल १९८१ पृ. १०

०७. www.directorate.marathi.gov.in/state/1976-3.pdf